दिनांक ३०/०३/२०२६

वार्तापत्र ( **PRESS NOTE** )

**( ओडीसा राज्यातून मुंबई शहरात विमानाने येऊन एटीएम मशीन मध्ये वयोवृद्ध लोकांना पैसे काढतांना त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्याकडून एटीएमची कार्ड ची अदलाबदली करून अनेक लोकांची फसवणूक करणाऱ्या तसेच मागील ०४ वर्षांपासून वॉन्टेड असलेल्या आरोपीतास दिंडोशी पोलीस ठाणे येथे अटक करुन वेगवेगळया पोलीस ठाणेचे एकुण ०४ गुन्हे उघड केलेबाबत...)**

दिनांक २०/०२/२०२६ रोजी तक्रारदार नामे श्री विश्वास सदानंद भुसाने वय ७१ वर्षे, रा.ठी. डी/१३, वृंदावन ०३, रहेजा टाऊनशिप मालाड पूर्व मुंबई हे स्टेट बॅक ऑफ इंडीयाच्या एटीएम, राणीसती मार्ग , मालाड पुर्व, मुंबई येथे एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले असतांना कोणीतरी अनोळखी इसमाने हातचलाकी करुन त्यांचे एटीएम ची अदलाबदली करुन त्यांच्या एटीएम मधुन ४०,०००/– रुपये फिर्यादी यांच्या परवानगीशिवाय लबाडीच्या इराद्याने काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली म्हणुन दिंडोशी पोलीस ठाणेस गु.र.क्र. १२१/२०२६ कलम ३१८(४) भा. न्या. संहिता अन्वये गुन्हा नोंद होता.

सदरचा गुन्हा हा वयोवृध्द इसम यांच्या फसवणुकीचा असल्याने सदरबाबत तो उघडकीस आणणेबाबत मा. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे सदर गुन्हयाचा मागील ०१ महिन्यापासुन ६० ते ७० सीसीटिव्हि फुटेज तपासुन, गुप्त बातमीदार व तांत्रिक पध्दतीने तपास करून एटीएम अदलाबदली करुण फसवणुकीमधील सराईत आरोपित संभवकुमार कृष्णचंद्र आचार्य, वय ३५ वर्ष, काम– बिगारीकाम, राहणार– गोपीकिशन पाटील कॉम्प्लेक्स जुचंद्रा, नायगाव पूर्व, वसई पूर्व, पालघर यास दिनांक २८/०३/२०२६ रोजी अटक करण्यात आले आहे. **सदर आरोपीताकडुन रोख रक्कम, विविध बॅकांचे २५ एटीएम कार्ड, ०२ मोबाईल फोन इत्यादी हस्तगत करण्यात आलेले असुन सदरबाबत पोउपनि अजित देसाई अधिक तपास करीत आहेत.**

**उघडकीस आलेले गुन्हे –**

१) दिंडोशी पोलीस ठाणे गु.र.क्र. १२१/२६ कलम ३१८(४) भा.न्या.सं.

२) कस्तुरबा पोलीस ठाणे गु.र.क्र. ६१२/२४ कलम ३१८(४) भा.न्या.सं. सह ६६(क)(ड) आयटी ॲक्ट

३) वनराई पोलीस ठाणे गु.र.क्र. ३८९/२४ कलम ३०३(२), ३१८(४) भा.न्या.सं.

४) कुरार पोलीस ठाणे गु.र.क्र. ३५३/२४ कलम ४२० भा.द.वि.

सदर आरोपीताने मागील ०४ वर्षांपासुन मुंबई शहर, ठाणे, व ओडीसा याठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केलेले असल्याचे त्याने सांगितले असुन सदरबाबत कोठे गुन्हे दाखल असल्यास दिंडोशी पोलीस ठाणेस माहिती देण्यात यावी.

सदरची कौशल्यपूर्ण कामगिरी मा. श्री. शशीकुमार मीना, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. महेश चिमटे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२, मुंबई व मा. श्री. विजय भिसे, सहा. पोलिस आयुक्त, दिंडोशी विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडोशी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. महेंद्र शिंदे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) श्री. शरद सुर्वे, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उप निरीक्षक अजित देसाई, स.फौ. मोरे, पो.ह. हेमंत रोडे, शंकर माईंगडे, भोगले, पो.शि. काटे, जानराव, झिंबल व तांत्रिक मदत पो.ह. सागर पवार यांनी केली आहे.